दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक २६२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.१७ डिसेंबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# बैलगाडा शर्यतीला सशर्त परवानगी; सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल



**नवी दिल्ली: वृत्तसंस्था**

**बैलगाडा शर्यतीला सर्वोच्च न्यायालयानं सशर्त परवानगी दिली आहे. त्यामुळे बैलगाडा मालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. तब्बल ७ वर्षांनी राज्यात बैलगाडा शर्यतीचा धुरळा उडणार आहे. मुकूल रोहतगी यांनी या प्रकरणात राज्य सरकारची बाजू मांडली. या निर्णयानंतर बैलगाडा मालकांनी आनंद व्यक्त केला.**

चार वर्षांपूर्वी सर्वोच्च न्यायालयानं बैलगाडा शर्यतींवर बंदी घातली होती. मात्र, आता ही बंदी उठवण्यात आली आहे. बैलगाडा शर्यती आयोजित करताना नियमांचं पालन करावं लागेल. नियमांच्या चौकटीत राहून शर्यतीचं आयोजन करावं लागेल. पशू क्रूरता प्रतिबंधक कायद्यातंर्गत नियमांचं पालन करणे बंधनकारक असेल.

या प्रकरणात उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. काल राज्य सरकारकडून सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद करण्यात आला होता. त्यानंतर शुक्रवारी पेटा या संस्थेकडून बाजू मांडण्यात आली. दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर सर्वोच्च न्यायालयानं राज्यात बैलगाडा शर्यतीला सशर्त परवानगी दिली. या निर्णयामुळे राज्यातील बैलगाडा मालकांमध्ये आनंदाचं वातावरण आहे. बैलगाडा शर्यतीचा मार्ग ७ वर्षांनी मोकळा झाला आहे.

बैलगाडा शर्यतीवर घालण्यात आलेली बंदी न्यायालयानं उठवल्यानं गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी समाधान व्यक्त केलं. बैलगाडा शर्यतीवर असलेल्या बंदीमुळे शेतकरी नाराज झाले होते. त्यामुळे ही बंदी उठवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील होतो. अखेर आज बैलगाडा शर्यतीला परवानी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे निश्चितच सर्वांना आनंद झाला आहे, असं वळसे पाटील म्हणाले. सर्वोच्च न्यायालयानं शर्यतीला सशर्त परवानगी दिली आहे. त्यामुळे आता सर्वांनी नियमांचं पालन करुनच शर्यतीचं आयोजन करावं, असं आवाहन पाटील यांनी केलं.

# नगरसेविका उज्वला विजय पाटील यांच्या सासरे व सिमेंटचे व्यापारी देविदास पाटील व्यांच्यावर खुनी हल्ला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तोंडरे (तळोजा एम आयडीसी) गाव–ातील नगरसेविका उज्वला विजय पाटील यांचे सासरे सिमेंट व बिल्डिंग मटेरियलचे व्यापारी देविदास पाटील (वय ६२) यांच्यावर ते ऑफिसमध्ये बसले असताना त्यांच्यावर खुनी हल्ला करण्यात आला.

त्या हल्ल्यात ते मरण पावले म्हणून त्यांना मारेकऱ्यांनी तेथेच टाकून पळ काढला. त्यांना ताबडतोब वाशी येथील एमजीएम मध्ये केले दखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक



आहे.

तळोजा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेन्द्र सोनवणे यांनी तळोजा पोलिस ठाण्याचा कारभार हाती घेतल्यानंतर मारेकऱ्यांनी तोंड काढल्याचे पाहायला मिळते की काय अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत. पण सिंघम असलेले जितेन्द्र सोनवणे त्यांच्या मुसक्या आवळणार यात शंका नाही.

मारेकऱ्यांचे सिसीटिव्ही फोटोज् हाती लागले असून मारेकरी जास्त वेळ लपून बसू शकत नाहीत ते कुठेही असले तरी त्यांच्या मुसक्या आवळणार असा आत्मविश्वास जितेन्द्र सोनवणे यांनी व्यक्त केला.

# खोपोली जवळ रिक्षाला टेम्पोची धडक ; १ ठार २ जखमी

**दै.रायगड नगरी । खोपोली**

मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र ४ वरून बिहारहुन कामासाठी आलेले मजूर खोपोलीच्या दिशेने रिक्षाने जात असताना शेंडीवली फाटा येथे पहाटेच्या दरम्यान एका टेंपोने रिक्षाला धडक दिल्याने जबर अपघात झाला. या अपघातात रिक्षात बसलेला प्रवासी मजूर जागीच ठार झाला तर त्याच्या सोबत असणारे जखमी झाले आहेत. हाताला काम मिळविण्याच्या शोधात आलेल्या मजुरांवर जीव गमवण्याचे संकट आले तर यात रिक्षा चालकासह अन्य दोन प्रवासी सुदैवाने बचावले.



याबाबत मिळालेली माहिती अशी की बिहार राज्यातून खोपोली येथे कुटुंबाच्या उदरनिर्वाह करणयासाठी हाताला काम मिळविण्यासाठी आपल्या सहकारी वर्गासोबत आल्याने पनवेल येथून पहाटेच्या दरम्यान रिक्षा क्र. रिक्षा एम एच ०५ डी क्यू २८७८ खोपोली च्या दिशेने येत असताना मुंबई बाजू कडे भरधाव वेगात येणाऱ्या दुधाच्या टँकरने रिक्षाला शेडोली फाटा येथे पहाटे ३ वाजण्याच्या दरम्यान आले असता रिक्षाला जबरदस्त धडक दिली.

रिक्षा पलटी मारल्याने यातील तीन प्रवासी व चालक यांना मार बसल्याने यातील पासवान या मजुरांचा जागीच मृत्यू झाला तर चालकासह अन्य दोन प्रवासी जखमी झाल्याने त्यांना तात्काळ उपचारासाठी पाठविण्यात आले.

## संक्षिप्त...

# नववर्षाचा जल्लोष, पार्ट्यांवर पडणार धाड

**दै.रायगड नगरी । मुंबई**

परदेशी पाहुण्यांमुळे ओमायक्रॉनचा धोका वाढल्याने महापालिकेने मुंबई विमानतळावर काटेकोर तपासणी सुरू केली. सार्वजनिक ठिकाणी गर्दी टाळण्यासाठी महापालिकेने २४ प्रशासकीय विभागांत प्रत्येकी दोन पथके तयार केली आहेत. डिसेंबर महिन्याच्या अखेरच्या आठवड्यापासून सुरू होणाऱ्या नववर्षाच्या पार्ट्या, जल्लोषावर या पथकाचे लक्ष असणार आहे. नियम मोडणाऱ्या सभागृह, हॉटेलमालक यांच्यावर पोलिसांच्या मदतीने कारवाई केली जाणार आहे.

कोविडच्या दुसऱ्या लाटेचा प्रसार मुंबईत आता पूर्णपणे नियंत्रणात आला आहे. दक्षिण आफ्रिका, युरोप अशा देशांमधून आलेल्या बाधित प्रवाशांमुळे ओमायक्रॉनचाही मुंबईत शिरकाव झाला आहे.

सर्व निर्बंध शिथिल करण्यात आले असल्याने विनामास्क फिरणाऱ्या लोकांची संख्या वाढली आहे. अनेक ठिकाणी कोविड प्रतिबंधक नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे. २५ ते ३१ डिसेंबर या काळात नववर्षाच्या स्वागताचा जल्लोष व पार्ट्या मोठ्या प्रमाणात आयोजित केल्या जातात. कोणताही धोका न पत्करता गर्दी होणाऱ्या ठिकाणांवर विभागस्तरावर लक्ष ठेवले जाणार आहे. महापालिकेमार्फत २४ विभागस्तरांवर प्रत्येकी दोन पथके तयार करण्यात आली आहे. आवश्यकतेनुसार प्रत्येकी दोन पथके वाढविण्याची तयारी पालिकेने ठेवली आहे. ही पथके त्या त्या विभागांतील हॉटेल, बंदिस्त सभागृह, मोकळ्या जागेतील कार्यक्रम यावर लक्ष ठेवून असणार आहे. या ठिकाणी निश्चित करण्यात आलेल्या क्षमतेएवढे अथवा त्यापेक्षा कमी लोकांची हजेरी असणे अपेक्षित आहे. तसेच मालक, कर्मचारी, ग्राहक यांच्या तोंडाला मास्क आणि सुरक्षित अंतर असणे आवश्यक आहे. राज्य सरकारकडून सुधारित नियमावली येण्याची शक्यता आहे.

### तहसीलदार विजय तळेकर यांचे नागरिकांना आवाहन

# ‘न्यू इअर’ सेलिब्रेशन पार्ट्यांवर प्रशासनाची राहणार करडी नजर

## नियमांचे उल्लंघन झाल्यास होणार कडक कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नववर्षाच्या स्वागतासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या पार्ट्यांवर जिल्हा प्रशासनाने आता करडी नजर ठेवली आहे. विनापरवाना पार्ट्या आयोजित करणाऱ्यांबरोबरच कोविड नियमांचे उल्लंघन करणा–या आयोजकांना कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. रायगडचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकार यांच्या सूचनेनुसार पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुक्यातील विविध आस्थापनांवर न्यू इअर सेलिब्रेशनच्या धर्तीवर करडी नजर ठेवली जाणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.



लसीकरण अपूर्ण असणे, मास्क परिधान करणे, सामाजिक अंतर न राखणे, कोविड अनुरूप वर्तन न करणे आदी कोविडच्या नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. याबरोबरच पनवेल तालुक्यातील जिमखाना क्लब, नाईट क्लब, विवाह सोहळे, रेस्टॉरंट, हॉटेल्स, रिसॉर्ट, कॉटेज, सिनेमागृहे, शॉपिंग मॉल, कंपनी, धार्मिक स्थळे, कोचिंग क्लासेस, सार्वजनिक स्थळे, खाजगी कार्यालये आदी आस्थापनांवर कोविडच्या अनुषंगाने प्रशास–नाची करडी नजर राहणार आहे. तसेच विनामास्क आढळणाऱ्या नागरिकांवरही दंड आकारला जाणार आहे. या अनुषंगाने सर्व नियमावलीचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन तहसीलदार विजय तळेकर यांच्याकडून करण्यात आले आहे.

सरत्या वर्षाला निरोप देतानाच नवीन वर्षाच्या स्वागतासाठी शहर आणि परिसरातील हॉटेल्स, पब, फार्म हाऊसमध्ये मोठ्या प्रमाणात पार्ट्यांचे आयोजन केले जाते. पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक फार्म हाऊस आहेत. दर वीकेंडला फार्म हौऊसवर पार्ट्यांचे बेत रंगतात. त्यातच काही दिवसांवर न्यू इयर सेलिब्रेशन येणार असून नागरिकांनीही सतर्कता बाळगणे आवश्यक आहे. ‘न्यू इअर’ ला होणाऱ्या पार्ट्यांवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष पथके तयार केली आहे.

पार्टीच्या ठिकाणी जाऊन ही पथके धडक तपासणी करून बेकायदा प्रकार घडल्यास कारवाई करणार आहेत.

# परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत मच्छी मार्केट मधील विकासकामांचे भूमिपूजन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १९ मध्ये असलेल्या मच्छी मार्केट मधील विकासकामाचे भूमिपूजन महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत व स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी यांच्या हस्ते आज (दि. १६) करण्यात आले.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या दूरदृष्टिकोनातून पनवेल नगरीचा शाश्वत विकास होत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेतील सत्ताधारी लोकप्रतिनिधी नागरिकांच्या समस्या सोडविण्याचे प्रामाणिक प्रयत्न करत असतात. त्यामुळे पनवेल महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकासकामे सातत्याने होत आहे. पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून पनवेल शहरातील प्रभाग क्रमांक १९ मध्ये असलेल्या अंतिम भूखंड क्रमांक २६१ मधील मच्छी मार्केट व पार्किंगचा रस्ता कॉँक्रटीकरण करणे तसेच पार्किंग क्षेत्रातील उंची वाढवणे हे विकासकाम करण्यात येणार आहे. या कामासाठी ०१ कोटी २६ लाख रुपये खर्च होणार असून यामुळे नागरिकांना मोठा फायदा होणार आहे.

या भूमिपूजन कार्यक्रमास नगरसेविका दर्शना भोईर, नगरसेविका रुचिता लोंढे, भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते हरिचंद्र भगत. गणेश भगत, .../२


# तळा तालुक्यात गुटखा बंदीचा उडाला फज्जा

## बंदी असुनही होतेय सर्रास विक्री ; अन्न औषध प्रशासनाचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । तळा**

महाराष्ट्र राज्यात गुटखा बंदी आहे मात्र तरीही तळा तालुक्यात कानाकोपरयात अनेक ठिकाणी छुप्या मार्गाने गुटखा विक्री सुरु आहे.तालुक्यात अनेक दुकानदारांनी केवळ वरकमाईसाठी गुटखा पाकीटे अवैध मार्गाने खरेदी विक्री सुरु ठेवल्याने या गुटखा बंदीचा तळा तालुक्यात अन्न औषध प्रशासन आणि स्थानिक पोलीसांच्या वरद–हस्ताने फज्झा उडाला आहे.

वृत्तपत्रात गुटखा विक्री बाबत अनेक वेळा वृत्त येऊन सुध्दा अन्न औषध प्रशासनाचे अधिकारी काहीच कारवाई करत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे या अवैध गुटखा विक्रीतुन रोज लाखो रुपयांची ऊलाढाल होत आहे शासनाने गुटखा बंदीचा कायदा केला मात्र या बंदीमुळे सध्या गुटखा तीप्पट किंमत घेवुन विकला जात आहे स्थानिक दुकानदार गुटखा कागदात गुंडाळून विक्री करतात गुटखा विक्री करणारे



तालुक्यात मोठय़ा प्रमाणावर सक्रीय झाले असुन यावर कारवाई होणार तरी कधी? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे गुटखा खाणारयांना गुटखा विक्रीची दुकाने सापडतात मात्र अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकारयांना त्याचा पत्ता का लागत नाही हा सर्वसामान्यांना पडलेला प्रश्न आहे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गुटखा चोरट्या मार्गाने आयात होतो आणि .../२

### एमआयडीसी प्रकल्प, बल्क ड्रग पार्क, विरार कॉरिडॉरचे सक्तीचे भुसंपादन थांबविण्यासाठी

# शेतकऱ्यांचा अलिबाग जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा

**दै.रायगड नगरी । पेण**

रायगड जिल्ह्यात विवीध प्रकल्पांसाठी सुरु असलेले सक्तीचे भुसंपादन थांबवावे या मागणीसाठी मुरुड, रोहा आणि पेण तालुक्यातील शेतकऱ्यांनी अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. या मोर्चात शेकाप आण भाजपच्या नेत्यांनी सहभागी होत पाठींबा जाहीर केला.

अलिबाग येथील शेतकरी भवन येथून या मोर्चाला सुरवात झाली बस स्टँड, महावीर चौक, जुनी नगर पालिका इमारत, स्टेट बँक ऑफ इंडीया समोरून मार्गे हा मोर्चा जनरल अरुण कुमार वैद्य विद्यालया जवळ दाखल झाला. येथे पोलीसांनी मोर्चा अडविला. याठिकाणी मोर्चेकरी शेतकऱ्याना सामाजिक कार्यकर्ते, आणि राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांनी संबोधित केले. उल्का महाजन, पेणचे भाजप आमदार रविशेठ पाटील, अलिबाग शेकाप आमदार जयंत पाटील, अरुण शिवकर, वैशाली पाटील, के.जी.म्हात्रे यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

पेण तालुक्यात डोलवी–वडखळ,गडब येथील एमआयडीसी प्रकल्प कायमस्वरूपी रद्द करावा. रोहा आणि मुरुड तालुक्यात बल्क ड्रग पार्क प्रकल्प प्रस्तावित आहे. अलिबाग विरार कॉरिडॉर साठी सक्तीचे भुसंपादन थांबवावे, हेटवणे धरणाचे पाणी पुरवून शेती दुपिकी करावी अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या. यापुर्वी जिल्ह्यात औद्योगिकीकरणासाठी संपादीत केलेल्या जागा वापराविना पडून आहे, त्यांचा वापर उद्योगांसाठी .../२



# तिढ्याचे राजकारण

इतर मागासवर्गीयांच्या (ओबीसी) आरक्षणाबाबत 'हा मूलभूत हक्क नसल्याचे' सांगत, सर्वोच्च न्यायालाने जनहित याचिका फेटाळली आहे. केंद्र सरकारने आपल्याकडे ओबीसींचा डेटाच नसल्याचे सांगितल्याने, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी जागांवरील निवडणुका न घेण्याचा दिलेला निर्णय बदलून, या जागांवर खुल्या प्रवर्गात निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने सांगितल्याने, राजकारणाचा गुंता वाढणार आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये राजकीय आरक्षण पन्नास टक्क्यांच्या पुढे जात असल्याबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या खटल्याचा सहा डिसेंबर रोजी निकाल आल्यावर, पुन्हा काही मुद्द्यांवर जनहित याचिका करण्यात आली. त्याचा निर्णयही ओबीसी आरक्षणाच्या बाजूने न लागल्याने, 'भाजप विरुद्ध महाविकास आघाडी' असा जंगी सामना रंगणार आहे. आम्ही तुमच्या बाजूने आहेत; पण आमचा प्रतिस्पर्धी पक्ष तुमच्यावर अन्याय करतो आहे, हे लोकसंख्येत सर्वाधिक टक्केवारी असलेल्या ओबीसी समाजाला दर्शविण्याच्या अनुषंगानेच आता राजकारण होणार आहे. हे होत असताना, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींना प्रतिनिधित्व मिळणार नाही, याचे कोणालाच सोयरसूतक नाही. हा तिढा थोडक्यात समजून घेतला, तरच त्यामागील राजकारण लक्षात येऊ शकेल. नरसिंह राव पंतप्रधान असताना करण्यात आलेल्या त्र्याहत्तर व चौऱ्याहत्तराव्या घटनादुरुस्तीत, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुसूचीत जाती व जमातींना लोकसंख्येनुसार आरक्षण देणे अनिवार्य केले गेले. ओबीसींना आरक्षण देण्याचा निर्णय राज्यांनी घ्यावा, असेही सांगितले गेले. या घटनादुरुस्तीबाबत सर्वोच्च न्यायालयातील कृष्णमूर्ती खटल्यात, 'ओबीसी हे मागासवर्गीय असून त्यांना आरक्षण मिळणे गरजेचे आहे; मात्र त्यासाठी इम्पिरिकल डेटा असायला हवा,' असे न्यायालयाने म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयानेच, इंद्रा सहानी खटल्यात आरक्षणाबाबात पन्नास टक्क्यांची मर्यादा ओलांडता येणार नाही, असेही नमूद केले. महाराष्ट्रात काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पन्नास टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली; कारण १९९३मध्ये तेथे ओबीसींना सरसकट २७ टक्के आरक्षण देण्यात आले. काही आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये, घटनेनुसार आदिवासींना अधिक आरक्षण द्यावे लागत असल्यामुळे ओबीसींचे आरक्षण कमी करणे गरजेचे होते. ते केले गेले नाही; कारण त्यासाठी आवश्यक आकडेवारी जमा करण्याची तोशीस कोणालाच नको होती. सर्वोच्च न्यायालयाने याबाबत संकेत दिल्यानंतरही, देवेंद्र फडणवीस यांनी, भविष्यातील निकाल विरोधात गेल्यास तो मान्य करण्याचे शपथपत्र निवडणूक आयोगाला दिले; मात्र आकडेवारी गोळा करण्याचे काम त्यांच्या सरकारनेही केले नाही. सन २०११च्या जनगणनेत ओबीसींची आकडेवारी गोळा केली; मात्र त्यात काही त्रुटी असल्याने व जनगणना कायद्यानुसार गोळा केली नसल्यामुळे ती महाराष्ट्राला देता येणार नाही, असे केंद्राचे म्हणणे होते. आता तर, अशी आकडेवारीच आमच्यापाशी नाही, असे केंद्र सांगत आहे. तसे असेल, तर गोपिनाथ मुंडेंपासून फडणवीसांपर्यंतचे नेते कोणती आकडेवारी मागत होते, याचा खुलासा केंद्राने करायला हवा. या सगळ्या गोंधळात राज्याने अध्यादेश जारी करून, कुठल्याही जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये एकूण आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही, असा तोडगा काढला. याच आधारावर इतर काही राज्यांतही निवडणुका होत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने या विषयात शिरण्यास नकार देत, महाराष्ट्रापुरता निर्णय दिला आहे. यामुळे निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेल्या १०५ नगरपंचायती, १५ पंचायत समिती व भंडारा, गोंदिया जिल्हा परिषद आदींच्या निवडणुकांमध्ये ओबीसी राखीव प्रभागात खुला प्रवर्ग म्हणून निवडणूक घ्यावी लागेल. त्यात खुल्या प्रवर्गातील लोकांना अर्ज न भरता आल्याने त्यांचे काय करायचे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. या निकालामुळे देशाच्या लोकसंख्येतील अर्ध्यापेक्षा अधिक हिस्सा व्यापणाऱ्या ओबीसींच्या राजकीय भवितव्यापुढे प्रश्नचिन्ह लागले आहे. वसंतराव भागवत यांनी भारतीय जनता पक्षाची 'शेटजी–भटजींचा' ही प्रतिमा बदलण्यासाठी, ओबीसी समाजातून अनेकांना नेतृत्वाची संधी दिली. त्यातूनच गोपिनाथ मुंडे आणि एकनाथ खडसेंसारखे नेते तयार झाले. फडणवीसांच्या कारकिर्दीत भाजपचा ओबीसी चेहरा थोडा मागे पडला. भुजबळांमागे लागलेल्या शुक्लकाष्ठानंतर तेही पक्षातील मागच्या बाकावर फेकले गेले. या घोळाचे पाप आघाडीच्या माथी मारून, भाजप राजकीय रणांगणात उतरेल, यात वाद नाही. दुसरीकडे भुजबळांच्या बाहूंना बळ देण्याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेसला पर्याय नाही. ओबीसींना राजकारणात सर्वाधिक वाव देणाऱ्या शिवसेनेचे प्रमुख आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे या तिढ्यातून कसा मार्ग काढतात, हे पाहण्यासारखे असेल.

# केंद्र सरकारच्या खाजगीकरणाच्या धोरणाविरोधात पाली सुधागडातील बँक कर्मचारी संपावर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

केंद्र सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या खासगीकरणाची घोषणा केली असून, बँक खाजगीकरणाच्या या धोर–णाला बँक कर्मचाऱ्यांनी कडाडून विरोध केला आहे.




त्या धोरणाविरोधात देशातील बँक कर्मचारी १६ व १७ डिसेंबर रोजी संपावर गेले आहेत. पाली सुधागड सह रायगड जिह्यातील सार्वजनिक क्षेत्रातील बँक कर्मचारी दोन दिवस होणाऱ्या संपात सहभागी झाले आहेत. त्यामुळे जिल्ह्या–तील सर्व सहकारी बँका बंद होत्या. बँकेच्या संपाचा गोरगरीब सर्वसामान्य जनतेला फटका बसला तर सर्व आर्थिक व्यवहार खोळंम्बल्याने अनेकांची गैरसोय झाली आहे. विशेष म्हणजे सध्या सर्वत्र निवडणुकांची धामधूम सुरू आहे, पालीत नगरपंचायत निवडणूकीचा प्रसार प्रचाराला वेग आला आहे. अशातच उमेदवारांना पावलोपावली खर्चासाठी पैसे लागतात,मात्र ऐन मोक्यात बँकेचा संप असल्याने उमेदवारांची चांगलीच अडचण व गैरसोय होत असल्याचे दिसत आहे. बँका सुरू व्हाव्यात अशी मागणी जोर धरत आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मागील वर्षी अर्थसंकल्प सादर करताना सार्वजनिक क्षेत्रातील दोन बँकांचे खासगीकरण करण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्याला या कामगार संघटनांमार्फत विरोध होत आहे. या विरोधामध्ये हा दोन दिवसांचा संप करण्यात येत आहे.

बँक कर्मचारी संघटनांच्या संयुक्त समितीने याबाबतची घोषणा केली आहे. त्याचप्रमाणे बँकिंग लॉ विधेयक २०२१लाही कर्मचारी संघटनांचा विरोध आहे. भारतीय स्टेट बँकेने आपल्या कर्मचाऱ्यांना संपात सहभागी न होण्याचे आवाहन केले होते, मात्र कर्मचाऱ्यांनी ते धुडकावले आहे. त्यामुळे पालीतील स्टेट बँक व इतर बँका बंद असल्याचे दिसून आले. सुधागड तालुका आदिवासी बहुल तालुका असल्याने डोंगरदर्या खोऱ्यातून माळरान पठारावरून लोक बँकेच्या कामासाठी पाली, परळी, पेडली , नांदगाव याठिकाणी येतात, मात्र बँकेचा संप असल्याचे माहिती नसल्याने गोरगरीब सर्वसामान्य नागरिक जनतेचा वेळ, श्रम व पैसा वाया जातो. त्यामुळे सर्वसामान्य वर्गातून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. देशातील १३ कंपन्यांकडे थकीत असलेल्या ४.१६ लाख कोटी रुपयांपैकी २.८५ लाख कोटींची थकबाकी अद्यापही आहे. ती वसूल करण्यास प्राधान्य देण्याची मागणी संपकर्यांनी केली आहे.

# विविध मागण्यांसाठी उरण नगर पालिका कार्यालया समोर धरणे आंदोलन

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

उरण नगरपरिषदेमधील कंत्राटी सफाई कामगारांना शासकीय नियमानुसार किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी, बोनस , मेडीक्लेम पॉलीसी मिळावे या मागण्यांसाठी म्युनिसिपल एम्प्लाईज युनियनचे अध्यक्ष ॲड सुरेश ठाकूर आणि सरचिटणीस अनिल जाधव कार्याध्यक्ष संतोष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उरण नगरपरिषद कार्यालया समोर धरणे आंदोलन सूरू करण्यात आले होते

या आंदोलनाला माजी आमदार मनोहरशेठ भोईर आणि जेएनपीटी चे विश्वस्त कॉ. भूषण पाटील यांनी धरणे आंदोलनाला पाठींबा उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी सफाई कामगारांच्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले कामगारांच्या मागण्या पूर्ण न झाल्यास त्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडणार असे मत माजी आमदार मनो–हरशेठ भोईर यांनी व्यक्त केले.

उरण विधानसभा मतदारसंघातील उरण नगरपरिषदेमध्ये वर्षानुवर्षे काम करणारे सफाई कामगार १)किमान वेतन मिळणे, २) भविष्य निर्वाह निधीचा लाभ मिळणे व ३) बोनस मिळणे या मागण्यांसाठी धरणे आंदोलनाचा बसले आहेत. या कामगारांची शिवसेना जिल्हाप्रमुख मा. आमदार मनोहर शेठ भोईर जेएनपीटी चे गेले २० वर्षे विश्वस्त कामगार नेते कॉ. भूषण पाटील यांनी गुरवार दिनाकं १६ डिसेंबर २०२१ रोजी प्रत्यक्ष आंदोलनाला भेट देऊन त्यांच्या धरणे आंदोलनला पूर्णतः पाठिंबा दिला.

उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी बैठक घेऊन एक महिन्याच्या आत किमान वेतन संबधित ठेकेदाराकडून मिळवून देणार, त्याचबरोबर मागील महिन्याचा एरीयर्स मिळवून देणार, कामगारांना बोनस मिळण्याकरीता सुद्धा ठेकेदारासोबत चर्चा झालेली आहे. तसेच भविष्य निर्वाह निधी भरला जात आहे कि नाही याची खात्री करण्यात येईल व ती शासनाच्या नियमाप्रमाणे भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरण्यात येईल.

मेडीक्लेम तसेच मेडीकल चेकप हया सर्व बाबी एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येतील असे सांगून यापुढे कामगारांचे आर्थिक शोषण होणार नाही याची जबाबदारी त्यांनी घेतली.

## PUBLIC NOTICE

The Public in general is hereby informed that RAJENDRA SHANTARAM SANKHE and MRS. CHETANA RAJENDRA SANKHE, resident of at A-202, Sai Plaza, Sector-15 A, New Panvel, Navi Mumbai-410206, are negotiating to sell to my Client the Plot No.B3-33+34+35, situated at New Panvel (East), Tal-Panvel. The Plot is allotted to the above-named by CIDCO Ltd. Description of property is as under :-

| Village | Plot Number | Sector | Area in Sq. Mtrs. |
|---|---|---|---|
| New Panvel (East) | B3-33+34+35 | 6 | 72.3200 |

Any person having any rights, title, claim or interest in the said property, by way of sale, inheritance, possession, succession, mortgage, lien, lease, gift or otherwise howsoever in respect of the same, shall intimate the objection in writing to the undersigned with supporting documents thereof within 15 days from the date of publication to this notice or else any such claims by anyone shall not considered and my client shall proceed to conclude the negotiations and no claims shall be entertained thereafter.

Date : 17/12/2021
Place : Panvel

Sd/-
Adv. Neha Rathore
303, Parvati Aangan CHS,
Plot-66, Sector-21, Kamothe,
Navi-Mumbai-410209
Mob : 8652512867

अर्जदारतर्फे वकील
ॲड.एम. जे. पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे कोर्टात
क्रिमिनल एम ए नं.१३०९/२०२१
ने.ता.०४/०२/२०२२

श्री.माया रामा पाटील
वय : ५५ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.शिवकर, पो.चिखले, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
जन्म मृत्यू विवाह निबंधक
ग्रामपंचायत शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, १) अर्जदार हा वरील पत्यावर राहत असून, अर्जदाराचे वडील कै.रामा चाया पाटील हे दि.२९/१२/१९८५ रोजी मौजे : शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मरण पावले.

२) अनावधानाने काही कारणास्तव त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत शिवकर दप्तरी झालेली नाही, तसेच इतर कोणत्याही दप्तरी त्यांच्या मृत्यूची नोंद झालेली नाही.

३) सबब जन्म मृत्यू नोंद कायदा १९६९ कलम १३ (३) नुसार मृत्यूची उशिरा नोंद करून मिळणेबाबत संबंधित ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक यांना योग्य ते आदेश देण्यात यावेत याकरिता अर्जदार मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

४) सदर अर्जास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्याच्या हरकती पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांच्या न्यायालयाकडे ३० दिवसाच्या मुदतीत आत सादर कराव्यात. विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मा.न्यायालय अर्जदार यांच्या वडिलांची मृत्यूची नोंद होण्यासंबंधी ग्रामपंचायत शिवकर यांस योग्य ते आदेश पारित करतील याची नोंद सर्वांनी घ्यावी.

आज दि.१६/१२/२०२१ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

# माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेचा स्तुत्य उपक्रम : दिव्यांगांना ५% राखीव निधीची तरतूद

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या उत्पन्नातून ५% राखीव निधी अंतर्गत माथेरान शहरातील एकूण २८ दिव्यांग बांधवांना आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहून आपला उदरनिर्वाह करता यावा व माथेरान शहरातील प्रत्येक दिव्यांग बांधव सक्षम व्हावा हा उद्देश ठेवून थेट त्यांच्या खात्यात ८०००/– रुपये माथेरान नगर परिषदेतर्फे वितरित करण्यात आले.

यासाठी २०१७ पासून दिव्यांग बांधवांना थेट रक्कम देणारी माथेरान नगरपरिषद बहुदा रायगड जिल्ह्यातील ना–वाजलेली नगरपरिषद होय. याकरिता नगराध्यक्षा प्रेरणा सावंत, उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, गटनेते प्रसाद सावंत, विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदे मुख्याधिकारी सुरेखा भणगे सर्व सन्माननीय नगरसेवक /नगरसेविका तसेच कर्मचारी वृंद यांचे माथेरान दिव्यांग सेवा संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत जाधव यांच्या तर्फे सर्वांचे धन्यवाद व्यक्त करत चंद्रकांत जाधव यांच्या विशेष प्रयत्नातून मिळणाऱ्या रकमेतून प्रत्येक दिव्यांग बांधवाने सक्षम होण्यासाठी अधिकचे पाठबळ हवे असल्याचे मत व्यक्त केले.

तसेच अजूनही बरेसच्या दिव्यांग बांधवांकडे त्यांच्या अपंगत्वाचे प्रमाणपत्र नसल्याने त्यांनाही सिविल सर्जन रायगड अलिबाग येथून प्रमाणपत्र मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. लवकरच त्यांनाही यामध्ये सामावून घेतले जाईल त्याचप्रमाणे अनेक शासकीय योजनांच्या लाभापासून येथील दिव्यांग बांधव अद्याप वंचित असल्याची खंत चंद्रकांत जाधव यांनी व्यक्त केली. त्यांच्या दळणवळणाचा मार्ग सुकर व्हावा अशी इच्छा व्यक्त करण्यात आली.

अपंगांना शासकीय सुविधा उपलब्ध व्हायला हव्यात त्यासाठी जाधव हे नेहमीच प्रयत्नशील असतात त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून विशेष कौतुक होत आहे.

अर्जदाराचे वकील : सुशांत बालाजी पुरी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.प्रधान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दिवाणी संकीर्ण चौकशी अर्ज १८३०/२०२१
नि.नं.८/ड

श्री.रुची नितीन सिन्हा वगैरे ३ — अर्जदार
विरुद्ध
श्री.सचिन धिरेंद्र सिन्हा — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, १) सदरील अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ यांची सख्खी आई आहे. अर्जदार क्र.३ हे अर्जदार क्र.१ यांचे सासरे आणि अर्जदार क्र.२ यांचे आजोबा आहेत. अर्जदार हे शिर्षक कलमातील पत्यावरील कायमचे रहिवासी आहेत. अर्जदार क्र.१ यांनी स्वतःकरिता आणि अर्जदार क्र.२ ही अज्ञान असल्याने तिची पालनकर्ती आई म्हणून अर्जदार क्र.१ यांनी हा अर्ज दाखल केलेला आहे.

२) अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२ यांचे पिता आणि अर्जदार क्र.३ यांचा ज्येष्ठ पुत्र श्री.नितीन धिरेंद्र सिन्हा यांचे दि.१२ मे २०२१ रोजी अर्जदार यांचे शिर्षक कलमातील पत्यावर निधन झाले आहे.

३) सदरील अर्जदार क्र.३ यांची पत्नी आणि अर्जदार क्र.२ यांची आजी आणि अर्जदार क्र.१ यांची सासू सौ.इंदू धिरेंद्र सिन्हा या दि.७ जुलै २०२१ रोजी व्ही.आय.आर.हॉस्पिटल पनवेल येथे निधन पावलेल्या आहेत.

४) सामनेवाला हा अर्जदार क्र.३ यांचा सख्खा मुलगा असून अर्जदार क्र.१ यांचे दीर (अर्जदार क्र.१ यांच्या मृत पतीचा भाऊ) आणि अर्जदार क्र.२ यांचा सख्खा काका आहे. सदरील सामनेवाला हा शीर्षक कलमातील पत्यावर अमेरिका येथे राहत असल्यामुळे सदरील अर्जावर सही करण्यास हजर राहू न शकल्याने त्यांना सामनेवालेपणात सामील केलेले आहे.

५) सदरील अर्जदार १) श्रीमती.रुची नितीन सिन्हा २) कुमारी.आदिती नितीन सिन्हा ३) धिरेंद्र प्रसाद सिन्हा आणि सामनेवाला हेच कै.इंदू धिरेंद्र सिन्हा यांचे वारस आहेत. तसे भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारस दाखल्यासाठी अर्ज या मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. सबब, अर्जदार यांचे वारस हक्कास जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ती हरकत आमचेकडे लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेवून योग्य वाटल्यास अर्जदार यांस वारस दाखला देईल. मागाहून कोणाचीही हरकत आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

आज दि.१६ डिसेंबर २०२१ रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

यादृारे सामान्य जनतेला कळविण्यात येते आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णनामध्ये नमूद केलेली मिळकत **१) श्री.निर्मलसिंग चंदनसिंग २) श्री.बलबीरपाल हेमराज सैनी** यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्यााही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क–हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**

**मौजे : वलप, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील सर्व्हे नंबर / हिससा नंबर ११९/१, क्षेत्रफळ १०० हे.आर.पॉ. व सर्व्हे नंबर १२१, क्षेत्रफळ ०–४२–५ हे.आर.पॉ.**

**सही/–**
**व्ही.व्ही.खेमका**
**ॲडव्होकेट**
**९/५३, भुपेन चेंबर्स, तिसरा मजला,**
**दलाल स्ट्रीट, मुंबई–४००००२**
**मो.नं.९८२१४८५८५२**

मा.मुजावर साहेब कोर्ट
ॲड.अनिरुद्ध तुळसणकर, पनवेल
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१७६७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२८/०१/२०२२

१) श्रीमती.वृंदा भारत जोगळेकर
वय : ६५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.६, कौस्तुभ, अनंत पाटील रोड,
शिवाजी पार्क टेलिफोन एक्स्चेंज समोर
शिवाजी पार्क, दादर मुंबई ४०००२८
२) सौ.रसिका पराग साठे
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.४०१, कांचनबन सेनापती बापट रस्ता,
रत्ना हॉस्पिटलसमोर, शिवाजीनगर,
पुणे शहर, मॉडेल कॉलनी, पुणे ४११०१६
३) सौ.मानसी वसंत मराठे
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.ए/८०२, आनंद रेसिडेन्सी कॉडोमिनियम,
सिटी प्राईड सिनेमाजवळ, कोथरुड,
पुणे शहर, पुणे ४११०३८ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की,

१) अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ व ३ यांचे वडील कै.भारत रामकृष्ण जोगळेकर यांचे निधन दि.१६/११/२०१९ रोजी झाले आहे. त्याचप्रमाणे कै.भारत रामकृष्ण जोगळेकर यांच्या आई कै.प्रभा राकृष्ण जोगळेकर ०४/१२/२००१ यांचे देखील साधारणपणे २० वर्षापूर्वी देहावसान झालेले आहे. श्रीमती.वृंदा भारत जोगळेकर वगैरे ह्यांनी कै.भारत रामकृष्ण जोगळेकर यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

२) कै.भारत रामकृष्ण जोगळेकर यांच्या पोट भाडेहक्कांत चालत असलेल्या स्थावर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :–

अ) मे.जवाहर को.ऑपरेटीव्ह इंडस्ट्रीयल इस्टेट लि. यांचेकडील भूखंड क्रं.१५२, १५३ आणि १४४ एकूण क्षेत्र २१९३ यार्ड म्हणजेच २००५.२७ चौ.मी. असा भूखंड भारत रामकृष्ण जोगळेकर यांचे नावे पोट भाडेपट्टा हक्कांत व ताबेकब्जा वहिवाटीत होते व आहे.

वर श्रीमती.वृंदा भारत जोगळेकर वगैरे हे कै.भारत रामकृष्ण जोगळेकर यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.वृंदा भारत जोगळेकर वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.भारत रामकृष्ण जोगळेकर यांच्या वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.८/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत मच्छी मार्केट मधील विकासकामांचे भूमिपूजन

विभागीय अध्यक्ष पवन सोनी, ठेकेदार एल. टी. पाटील, मंगेश पिळविलकर, एकनाथ भोईर, लहू कोळी, कमलाकर कोळी, गजानन म्हात्रे, दत्ता पाटील, धर्मा भगत यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

## तळा तालुक्यात गुटखा बंदीचा उडाला फज्जा

तो खुलेआम विकला जातो

काही वर्षा पुर्वी महाराष्ट्र शासनाने गुटखा बंदी लागु केली होती त्यानंतर अनेक ठिकाणी छापे मारुन अन्न व औषध प्रशासन आणि पोलीसांनी लाखोंच्या किंमतीचा गुटखा हस्तगत केला होता मात्र ही गुटखा बंदी लागु झाल्यापासुन काळ्या बाजाराने गुटखा सर्वत्र मिळत आहे गुटख्याला पर्याय म्हणुन आता विविध कंपन्यांनी पान मसाले बाजारात आणले असुन या पान मसाल्यांबरोबर एक छोटी तंबाखुची पुडी मिळते या दोन पुड्या एकत्र करुन खाल्लयास गुटख्या सारखी चव लागते ज्यावेळी गुटखा खुलेआम मिळत होता तेव्हा अनेक शाळकरी मुले महीला वर्ग गुटखा खाऊ लागले होते मात्र शासनाने गुटखा बंदी केल्यापासुन हे प्रमाण कमी झाले असले तरी शासनाला पुर्णपणे गुटखा बंदी करता आलेली नाही अजुनही अनेक ठिकाणी विविध प्रकारचा गुटखा विक्री होत आहे.

## शेतकऱ्यांचा अलिबाग जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा

करावा, आधीच औद्योगिकरण आणि शहरीकरणामुळे रायगड जिल्ह्यातील शेतीक्षेत्र मोठ्या प्रमाणात घटले आहे. त्यामुळे यापुढे भुसंपादन करून शेतकऱ्यांना भुमीहीन आणि बेरोजगार करू नका असे मागणी यावेळी प्रशासनाकडे करण्यात आली. जिल्हाधिकारी यांनी शेतकऱ्यांच्या म्हणणे ऐकून घेतले. आणि त्यांच्या मागण्या राज्यसरकारला कळवण्यात येतील अशी ग्वाही शिष्टमंडळाला दिली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व संस्थापक मनोज संसारे यांना बंधुशोक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व संस्थापक मनोज संसारे यांचे बंधू राजेश संसारे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे.

राजेश संसारे हे आंबेडकरी चळवळीचे धडाडीचे कार्यकर्ते होते. मनोज संसारे यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांनी पक्षाच्या विस्तारासाठी अहोरात्र कष्ट केले. पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. मुंबई प्रदेशाध्यक्ष अमित हिरवे, महाराष्ट्र सचिव अशोक वाघमारे, महाराष्ट्र उपाध्यक्ष बाळाराम पाटील व इतर पदाधिकाऱ्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. तसेच रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी रायगड जिल्ह्याच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केली. त्यावेळी तालुकाध्यक्ष नरेश परदेशी, शहराध्यक्ष अविनाश अडागळे, महिला आघाडीच्या अध्यक्षा ममताज पठाण, शहर उपाध्यक्षा भारत दाताड आदींसह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.



राजेश संसारे यांच्या दुःखद निधनामुळे पक्षाचे न भरुन येणारे नुकसान झालेले आहे. तसेच अनेक कार्यकर्त्यांचे आधारस्तंभ गेला अशी भावना याप्रसंगी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

## सहाय्यक पोलीस आयुक्त बंदर विभाग कार्यालयास आयएसओ मानांकन

**दै.रायगड नगरी । उरण**

बृहन्मुंबई, नवीमुंबई व ठाणे आयुक्तालयातून जेएनपीटी बंदर विभागाच्या सहाय्यक पोलिस आयुक्त कार्यालयास प्रथम आयएसओ मानांकन मिळाले असल्याने मला आंनद झाला आहे. आयएसओ मानांकन मिळणे सोपी गोष्ट नाही, त्यासाठी बरेच कौशल्य, लागते आणि ते या बंदर विभागाचे सहाय्यक पोलिस आयुक्त सचिन सावंत यांनी योग्यतेने काम केले आहे. पुढील ३१ डिसेंबर २९२१ला ते सेवेतून निवृत्त होणार आहेत. येणाऱ्या सहाय्यक पोलीस आयुक्त अधिकाऱ्यास सदरचे नवीन कार्यालय सदैव प्रेरणा देत राहील, पुढील काळात जेएनपीटी एसीपी कार्यालयासजागा देण्यास तयार आहे.

आपल्या सर्वांचे सहकार्याने येथे सुसज्ज इमारत उभी करण्यास आमचे प्रयत्न राहतील, सर्वांच्या सहकार्यामुळे सर्व काही शक्य झाले आहे, असे प्रतिपादन नवींमुंबई पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालय पोर्ट विभाग विस्तारित व नुतनीकरण प्रसंगी केले.

सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालय विस्तारित व नुतनीकरण चे उद्घाटन नवीमुंबई पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह यांच्या हस्ते सहाय्यक पोलिस आयुक्त कार्यालय बंदर विभाग येथे झाले. नवीमुंबई पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह यांच्या हस्ते सहाय्यक पोलिस आयुक्तसचिन सावंत यांना आयएसओ मानांकन प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले.

या प्रसंगी नवीमुबई पोलीस आयुक्त बिपीन सिंह, पोलीस सहाय्यक आयुक्त नवीमुबई डॉ. जय जाधव डेप्युटी कमिशनर (गुन्हे) सुरेश मेंगडे, डेप्युटी कमिशनर (वाहतूक) पुरोशोत्तम कराड, सीआयएसएफचे कमांडर विष्णू सहाय, नवीमुबई परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे, नवी मुंबई मुख्यालयचे उपायुक्त अभिजित शिवथरे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ २ पनवेलचे शिवराज पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, जि प सदस्य विजय भोईर, कामगार नेते दिनेश पाटील, कामगार नेते भूषण पाटील, उरण नगराध्यक्षा सायली म्हात्रे, नरेश कोळी, न्हावाशेवा पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे, उरण पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सोनावणे, मोरा सागरी पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहिते, पोलिस कर्मचारी आदी उपस्थित होते.



## दत्त जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील धानकान्हे येथे दत्त जयंतीनिमित्त विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ग्रामस्थांकडुन देण्यात आली आहे.

ग्रामस्थ मंडळ धानकान्हे व नाथपंथीय गोसावी समाज धानकान्हे यांच्या वतीने सालाबादप्रमाणे हा उत्सव येथे मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न करण्यात येत आहे. तर याही वर्षी येथील मंदिरात सामाजिक कार्यकर्ते मारूती खांडेकर व सौ.मालती खांडेकर यांच्या हस्ते ता.१९ रोजी सकाळी देवतांना अभिषेक, होमहवन,श्री. सत्यनारायणाची महापूजा,दु.१२ वा.महाप्रसाद तसेच समाजातील विविध क्षेत्रातील सर्वोत्तम कामगिरी करणा-या मान्यवरांचा सन्मान, सायं.४ वा.ह.भ.प.श्रीधरमहाराज पोळेकर यांचे प्रवचन तद्नंतर हरिपाठ व रात्रौ जागर भजन आदी सामाजिक, धार्मिक व अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. या सर्व कार्यक्रमांचे यशस्वीसाठी ग्रामस्थ मंडळ धानकान्हे व नाथपंथीय गोसावी समाज धानकान्हे अधिक मेहनत घेत आहेत.

## कडधान्ये पिके बहरली ; शेतकरी वर्ग समाधानी

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

अवकळी पावसाचा मुकाबला करीत अखेर कडधान्ये पिके बहरल्याने शेतकरी वर्ग समाधानी झाला आहे. चालू ऊन्हाळी हंगामात शेतकरी वर्गाने खरीप पिक अंतर्गत दिवाळी सणानंतर आपापल्या शेती क्षेत्रात विविध कडधान्ये पिकांची लागवड केली. परंतू नुकत्याच होऊन गेलेल्या अवकळी पावसाने सर्वच क्षेत्राला मोठाच तडाखा दिल्याने शेती क्षेत्रही सुटू वकले नाही. पावसाळी हंगामातील भातशेतीचे तर मोठे नुकसान झालेच याशिवाय नुकतेच जमिननीतून वर आलेल्या कडधान्ये पिकालाही त्याचा फटका बसतोय की अशी भिती शेतकरी वर्गातून व्यक्त होत असतानाच कडधान्ये पिके नुकतीच चांगली बहरली असल्याने शेतकरी वर्ग समाधानी दिसत आहे. वाल, पावटे, मुग, मटकी, चवळी, उडीद, मटकी, चणा आदी कडधान्ये पिके शेतकरी वर्गाने आपापल्या शेतीत टाकली आहेत. परंतू नुकत्याच कोसळलेल्या अवकळी पावसाने सर्वच क्षेत्राला मोठा तडाखा दिला असतानाच कडधान्ये पिके पिकविणा-या शेतकरी वर्गाच्याही तोंडचे पाणी पळाले. परंतू अवकळी पावसाच्या तडाख्यातून कडधान्ये पिके सावरल्याने व पिकेही बहरल्याने शेतकरी वर्ग पुरता समाधानी झाला आहे.

## उरण चारफाटा येथे सार्वजनिक प्रसाधनगृह बांधण्याची द्रोणागिरी शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चारफाटा हे वर्दळीचे महत्वाचे ठिकाण असून महामंडळच्या एस टी बसेस, नवी मुंबई परिवहन सेवेच्या छ्वचढ बसेस, तीन आसनी रिक्षा, सहा आसनी रिक्षा इत्यादी प्रकारच्या वाहनांची चारफाटा येथे सतत ये जा सुरु असते. प्रवाशी येथून मोठ्या संख्येने प्रवास करीत असतात. मात्र येथे प्रसाधनगृहाची सुविधा नसल्याने प्रवाशांची खूप मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. आजूबाजूच्या परिसरात कुठेच योग्य सुसज्ज असे प्रसाधनगृह नसल्याने नागरिकांची खूप मोठ्या प्रमाणात कुचंबना होत आहे. यात स्त्रिया, लहान बालके, वृद्ध व्यक्ती, अपंग व्यक्तींना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे उरण चारफाटा येथे त्वरित सुसज्ज असे प्रसाधन गृह बांधण्यात यावे अशी मागणी शिवसेना द्रोणागिरी शहर प्रमुख जगजीवन भोईर यांनी सिडको प्रशासनाकडे पत्र व्यवहाराद्वारे केली आहे.

## आ. महेंद्र थोरवे यांच्या हस्ते खोपोलीत 'शिवसृष्टी'ची पायाभरणी

**दै.रायगड नगरी । खोपोली**

मुंबई पुण्याच्या मध्यवर्ती असलेल्या खोपोलीला मोठा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. त्यातच शिळफाट्यावर आ. महेंद्र थोरवे यांच्या संकल्पनेतून शिवसृष्टी उभी राहणार आहे. याचे भूमिपूजन नुकतेच आ. थोरवे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

खोपोली शहरातील शिळफाटा हे खोप-ोली शहराचे प्रवेशद्वार असून या परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचे आकर्षक स्मारक आहे व या ठिकाणचे सौंदर्य आणखी वाढविण्यासाठी 'शिवसृष्टी' ऐतिहासिक वास्तूचे निर्माण करण्यासाठी गटनेते सुनील पाटील यांनी आ. महेंद्र थोरवे यांच्याकडे मोठा अनुदान देण्याची मागणी केली होती. सदरील मागणी पूर्ण करीत आ. थोरवे यांनी नगर विकास खात्यातून ६.५ कोटी रुपयांचे वैशिष्ट्यपूर्ण व विशेष रस्ता अनुदानातून सव्वाकोटी रुपये शिवसृष्टी निर्मितीसाठी दिल्याने दि.१२ डिसेंबर रोजी आ. महेंद्र थोरवे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी खोपोली नगर परिषद मुख्याधिकारी अनुप दुरे, नगराध्यक्षा सुमनताई औसरमल, उपनगराध्यक्षा वनिता कांबळे औटी, तालुका प्रमुख संतोष विचारे, संपर्क प्रमुख पंकज पाटील, शिव सहकार सेनेचे शहर प्रमुख हरीश काळे, दिलीप पुरी, आनंद नायडू, चंद्रकांत फावडे, संजय पाटील, संदीप पाटील, प्रसाद वाडकर, संतोष मालकर, अनिल आंग्रे, प्रमोद महाडिक,



गटनेते तथा स्थानिक नगरसेवक सुनील पाटील, नगरसेविका वनिता काळे, ज्येष्ठ नगरसेवक मोहन औसरमल, तुकाराम साबळे, किशोर पानसरे, राजू गायकवाड, अमोल जाधव, नितीन मोरे, शिवसेना दिवेश राठोड, संतोष राठोड, परमार, ओसवाल, ईश्वर कासार, चव्हाण, शहाणे महिला आघाडीच्या जैबुनिसा शेख, सुरेखा खेडकर, सारिका निकम आदी उपस्थित होते.

---

अर्जदाराचे वकील : ॲड.सलमान रशीद पटेल

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.१३३४/२०२१
ने.ता.१७/०१/२०२२

श्री.फहद हुसेनमियॉ पटेल
वय : ३२ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.मु.पो.तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका, विभाग-तळोजा पाचनंद — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार श्री.फहद हुसेनमियॉ पटेल यांचा दि.०५/०५/१९८९ रोजी मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झालेला आहे. सदरहू अर्जदार यांनी त्यांच्या जन्माच्या तारखेची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

सदरहू श्री.फहद हुसेनमियॉ पटेल यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे सदरहू श्री.फहद हुसेनमियॉ पटेल यांच्या जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१६/१२/२०२१ रोजी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

---

मा.श्री.सोनावणे साहेब
अर्जदारांतर्फे ॲड.मंगेश एम. भोंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१८९८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०२/२०२२

१) सौ.शोभा भगवान कोंडीलकर
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.हातनोली, पो.चौक, ता.खालापूर, जि.रायगड
२) सौ.रत्नप्रभा कृष्णा घरत
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.रांजणपाडा, पो.जासई, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.एकनाथ रामदास म्हात्रे
वय : ६९ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.अनंत रामदास म्हात्रे
वय : ५६ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.नितीन केशव म्हात्रे
वय : ३६ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.रोशन केशव म्हात्रे
वय : ३२ वर्षे, धंदा : शेती
क्र.१ ते ४ रा.मो.पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.अर्चना नरेश मुंढे
वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.२, चाळ नं.१, गावदेवीपाडा,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.करुणा रोशन चौधरी
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.जुनी ताडाली, पो.मानघर, ता.भिवंडी, जि.ठाणे
७) सौ.नमिता कमलेश भोईर
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.मुर्बी गाव, पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, श्री.रामदास काळु म्हात्रे हे दि.२५/१२/२००१ रोजी मृत्यू पावले असून, त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मौजे : रोडपाली, ता.पनवेल**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| रोडपाली | ११ | १ पै | ०-१४-४ | १.७५ |
| रोडपाली १०५ (१) | १३ | ० | ०-२९-८ पो.ख.०-०१-८ | ४.८७ |

अर्जदार व सामनेवाले हे कै.रामदास काळू म्हात्रे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांचया वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार व सामनेवाला यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.१६/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्याया.पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्याया.पनवेल**

---

ॲड.धिरज सुराणा

### जाहीर नोटीस

उरण येथील दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर उरण यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.१८५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०२/२०२२

१) विधी दत्तात्रय पाटील
२) वेद दत्तात्रय पाटील
(त्याचे पालक श्री.दत्तात्रय दामोदर पाटील यांच्या माध्यमातून)
पत्ता : एफ नंबर १०१/इ, श्रीराज नगर के.अमगर वसाहत,
उरण, तालुका : उरण, जिल्हा : रायगड-४००७०२ — अर्जदार

वरील अर्जदार यांचे आई मयत सौ.शांता काशिनाथ पाटील @ श्रीमती. शांता दत्तात्रय पाटील यांचे दि.१९/०३/२०२१ रोजी उरण येथे निधन झाले. मयत सौ.शांता काशिनाथ पाटील @ श्रीमती.शांता दत्तात्रय पाटील यांचे नावे असलेली मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

SCHEDULE OF PROPERTY

1/7 th share in following acquired properties of shares & rights :-
Mauje : Pagote & Navghar, Tal-Uran, Dist-Raigad :-

| Sr. No. | VILLAGE | Tal | SURVEY No. | HISSA NO. | UNIT CASE NO | AREA |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Pagote | Uran | 20 | 6 | 216/85-86 | 0-01-3 |
| 2 | Pagote | Uran | 47 | 2 | 216/85-86 | 0-8-9 |
| 3 | Pagote | Uran | 89 | 6 | 216/85-86 | 0-12-6 |
| 4 | Pagote | Uran | 90 | 1 | 216/85-86 | 0-25-6 |
| 5 | Pagote | Uran | 92 | 7 | 216/85-86 | 0-04-0 |
| 6 | Pagote | Uran | 98 | 2 A | 216/85-86 | 0-12-0 |
| 7 | Pagote | Uran | 109 | 7 | 216/85-86 | 0-11-0 |
| 8 | Pagote | Uran | 98 | 6 | 74/85-86 | 0-20-0 |
| 9 | Navghar | Uran | 309 | 6 | 60/85 | 0-04-8 |
| 10 | Navghar | Uran | 309 | 8 | 60/85 | 0-04-5 |
| 11 | Navghar | Uran | 311 | 7 | 60/85 | 0-21-0 |
| 12 | Navghar | Uran | 312 | 10 | 60/85 | 0-13-0 |
| 13 | Navghar | Uran | 317 | 6 | 60/85 | 0-13-4 |
| 14 | Navghar | Uran | 317 | 8 | 60/85 | 0-13-7 |
| 15 | Navghar | Uran | 320 | 5 B | 60/85 | 0-19-2 |
| 16 | Navghar | Uran | 330 | 13 | 60/85 | 0-06-0 |
| 17 | Navghar | Uran | 336 | 7 | 60/85 | 0-10-9 |
| 18 | Navghar | Uran | 341 | 9 | 60/85 | 0-33-0 |
| 19 | Navghar | Uran | 352 | 12 | 60/85 | 0-03-04 |

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१२/११/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, उरण**

---

### सहनिबंधक सहकारी संस्था (सिडको) यांचे कार्यालय

**शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादीत**
बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं.०८, पाचवा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
फोन नं.(०२२-६७१२१०२५/२७५७४५०५)

जा.क्र.संनि/ससं/सिडको/१२५२/२०२१ — दि.१५/१२/२०२१

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम ११(२) व नियम २ (अन्वये)

### जाहीर नोटीस

चेअरमन/सेक्रेटरी
कामोठे, वैष्णवी अपार्टमेंट को.ऑप.हौ.सो.लि.
भूखंड क्र.१४, सेक्टर ०६ ए.कामोठे, नवी मुंबई — अर्जदार

विरुद्ध

१) मेसर्स आर.के.कन्स्ट्रक्शन तर्फे प्रो.प्रा.
श्री.राधेशकुमार बंगालीलाल दिवाकर
पत्ता : त्रिमुर्ती अपार्ट.भू.क्र.१४, सेक्टर ६, कामोठे, नवी मुंबई
२) श्री.विलास काशिनाथ शेळके
३) श्रीमती.जोगीबाई काशिनाथ शेळके
४) श्रीमती.कलावती विलास शेळके
५) श्रीमती.राघोबाई हरिभाऊ शेळके
पत्ता : सर्वजण रा.मु.कळंबोली गांव, ता.पनवेल, जि.रायगड
६) मा.व्यवस्थापक (शहर सेवा) २, साटयो,
सिडको लि.सिडको भवन, पहिला मजला,
सीबीडी बेलापूर, नवी मंबई — जाब देणार

कामोठे, वैष्णवी अपार्टमेंट को.ऑप.हौ.सो.लि. भूखंड क्र.१४, सेक्टर ०६ ए, कामोठे, नवी मुंबई या संस्थेचा दि.१७/११/२०२१ रोजी या कार्यालयात प्राप्त झालेला अर्ज

१) अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपूर्वी द्यावी.

२) जाब देणार यांनी त्यांच्या बचावासाठी व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीमार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपूर्वी लेखी उत्तर सादर करावे.

३) आपणाकडून प्राप्त झालेले लेखी उत्तर विचारात घेवून प्रकरणातील सुनावणी दि.२७/१२/२०२१ रोजी दुपारी ०२.०० वाजता निश्चित करण्यात येत आहे.

४) आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही, तर प्रकरणाची सुनावणी करण्यात येईल आणि एकतर्फी निर्णय देण्यात येईल.

५) आपणास सुनावणीचे वेळी पूर्वी १० मिनिटे अगोदर प्रवेश दिला जाईल. सुनावणी वेळेनंतर प्रवेश दिला जाणार नाही व सुनावणीस आपण गैरहजर आहात असे गृहीत धरण्यात येईल.

६) सुनावणीच्या वेळी एका पक्षकाराच्या वतीने जास्तीत जास्त दोन व्यक्तींना प्रवेश दिला जाईल.

७) सुनावणीचे वेळी लहान मुलांना सोबत आणू नये, कोणत्याही परिस्थितीत लहान मुलांना प्रवेश दिला जाणार नाही.

८) आपणास जे काही लेखी म्हणणे मांडावयाचे आहे ते आपण पीडीएफ (PDF) फॉर्ममध्ये स्वस्वाक्षरीसह या कार्यालयाचे JTRCIDCOHEAR@gmail.com या ईमेलवर सुनावणी दिनांकापूर्वी कमीत कमी एक दिवस अगोदर पाठवावे.

९) सुनावणीस येताना प्रत्येक व्यक्तींनी मास्क घालणे बंधनकारक राहील. विना मास्क प्रवेश दिला जाणार नाही.

१०) प्रवेश द्वारावर सॅनिटायझर उपलब्ध करून दिलेले आहे. त्याचा वापर करून प्रवेश दिला जाईल. तसेच प्रत्येक व्यक्तीच्या शरीराचे तापमान तपासले जाईल. ज्या व्यक्तीचे तापमान नियमित तापमानापेक्षा जास्त असे त्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

**सही/-**
**(डॉ.केदारी जाधव)**
**सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, नवी मुंबई**

---

राव साहेब

अर्जदारातर्फे वकील
संतोष ए. ठाकूर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.१५०४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०१/२०२२

१) श्रीमती.हिराबाई हिरामण गिरा
सज्ञान, वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर क्र.२-४, वलप, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.मंजुळा मंगा पारधी
सज्ञान, वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.बांधणवाडी (कोपऱ्याची वाडी), पोस्ट-वाडी,
श्री मलंग रोड, बांधणवाडी, ता.अंबरनाथ, ठाणे ४२१३०१
३) श्री.नागेश मंगा पारधी
सज्ञान, वय : २८ वर्षे, धंदा : शेतकरी
रा.मु.बांधणवाडी, पोस्ट : वाडी,
श्री मलंग रोड, ता.अंबरनाथ, ठाणे ४२१३०१
४) श्री.प्रकाश मंगा पारधी
सज्ञान, वय : २७ वर्षे, धंदा : शेतकरी
रा.मु.बांधणवाडी, पोस्ट : वाडी,
श्री मलंग रोड, ता.अंबरनाथ, ठाणे ४२१३०१
५) श्रीमती.कमला रामा चौधरी
सज्ञान, वय : ३७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर क्र.३४२, वार्घाची वाडी, (टेंभोडे),
पोस्ट कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८
६) श्रीमती.अंजली अनिल शिद
सज्ञान, वय : २६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कल्याण नगर, हायवे मु.पायरवाडी, पोस्ट : खुटल
(बारागाव), न्याहाडी, ता.मुरबाड, जि.ठाणे ४२१४०१
७) श्रीमती.धर्मी किसन पारधी
सज्ञान, वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.धामोळे गाव, गोल्फ कोर्स जवळ,
खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१०
८) श्री.रामदास कृष्णा पारधी
सज्ञान, वय : ३७ वर्षे, धंदा : शेतकरी
रा.घर क्र.१०८३, धामोळे गाव, गोल्फ कोर्स जवळ,
खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१०
९) श्री.हरिश्चंद्र कृष्णा पारधी
सज्ञान, वय : ३२ वर्षे, धंदा : शेतकरी
रा.धामोळे गाव, गोल्फ कोर्स जवळ, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१०
१०) श्री.रमेश कृष्णा पारधी
सज्ञान, वय : ३० वर्षे, धंदा : शेतकरी
रा.धामोळे गाव, गोल्फ कोर्स जवळ, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१०
११) श्रीमती.भारती नाना पारधी
सज्ञान, वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.गणेशपूर (मोरोशी), कल्याण-नगर हायवे जवळ,
ठाणे ४२१४०१
१२) श्रीमती.रत्ना मधू वाक उर्फ वाख
सज्ञान, वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मोर्याचा वाडा, बारवी डॅम रोड, कारंड,
पोस्ट : पिंपोली, अंबरनाथ ठाणे ४२१५०३
१३) श्री.दयाराम झिपरु उर्फ जिप्रू भगत
सज्ञान, वय : ३१ वर्षे, धंदा : शेतकरी
रा.मु.कवाड, पोस्ट : अनगाव, ता.भिवंडी,
कावड खुर्द, ठाणे ४२१३०२ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी तांबड्या डब्या पारधी हे दि.०१/०२/१९७४ रोजी मरण पावले आहेत व ज्याअर्थी सदर मयत तांबड्या डब्या पारधी यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची पुढीलप्रमाणे मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | सर्व्हे नं. / हिस्सा नं. | क्षेत्रफळ (ए.गुं.आणे) | केस क्र/ॲवार्ड क्र. |
|---|---|---|---|
| खारघर | ३९३/१ | ०-०८-० | १९८/१३६ |

सदर मिळकत अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी कै.तांबड्या डब्या पारधी यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता त्याने मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१५ माहे १२ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## २१ डिसेंबर रोजी कोकण विभागीय पेन्शन अदालत

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार दि.२१ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ११.०० वा. कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित केली आहे.

सदर पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जा-तील.

कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदा-लतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे तहसिलदार, (सामान्य प्रशासन) कोकण विभाग यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये कळविलेआहे.

## सिडको रेल्वे स्थानकाला धुतुम रांजणपाडा रेल्वे स्थानक असे नाव द्यावे : वैजनाथ ठाकूर

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात विविध विकासकामे सुरु असून रेल्वे विकासाचे जाळेही मोठ्या प्रमाणात पसरत आहेत. सिडको रेल्वे स्थानकाला रांजनपाडा रेल्वे स्थानक ऐवजी धुतुम रांजनपाडा रेल्वे स्थानक असे नाव देण्याची मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर यांनी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे एका पत्राद्वारे केले आहे.

सिडको बांधत असलेले रांजणपाडा रेल्वे स्थानक हे धुतुम ग्रामपंचायत हद्दीत असून सदरची जमीन ही धुतुम ग्रामपंचायतच्या मालकीची आहे.

त्यामुळे धुतुम ग्रामपंचायत हद्दीत सदर रेल्वे स्टेशन असल्यामुळे धुतुम ग्रामस्थांनी रांजनपाडा रेल्वे स्थानक या नावाला तीव्र विरोध केला आहे. त्यामुळे सदर रेल्वे स्टेशनला धुतुम रांजनपाडा असे नाव देण्यात यावे अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उरण विधानसभा मतदार संघांचे अध्यक्ष वैजनाथ ठाकूर यांनी रायगड लोकसभा मतदार संघांचे खासदार सुनील तटकरे यांच्याकडे पत्रव्यवहारद्वारे केली आहे.

# पुढील चार दिवस सोमरसाची त्सुनामी, निवडणुक हवामानाचा अंदाज, रेड लर्ट जारी

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

नगरपंचायत निवडणुक हातघाईवर आली असुन निवडणुकी आधी येत्या चार दिवसात सोमरसाची सुनामी येण्याची दाट शक्यता निवडणुक हवामानाचा अंदाज व्यंगवेधशाळेकडून वर्तविण्यात आल्याची गमतीदार चर्चा ऐकावयास मिळत आहे. लोक म्हणतात राजकीय टवाळखोरांनी आपल्या भक्त-गणांची शाळा घेण्यास सुरवात केली, तातडीने रेड लर्ट जारी करीत आपल्या पारड्यात भरघोस मतदान कसे पडेल यासाठी विशेष अशा अड्ड्यांवर, एकांतात झटपट कॉर्नर सभा संमेलन सुरु झाली आहेत.

सर्व मद्यप्रेमींची विशेष काळजी घेतली जात आहे. कारण मतदाना आधी एकदिवस व मतदानाच्या दिवशी तसेच मतमोजणीच्या दिवशी दारुबंदी 'सुका दिवस' (ड्रायडे) रेड लर्ट दिला गेला असुन निवडणुक म्हणजे आपली पंढरी पिकवा; मद्यगंगेत न्हाऊन घ्या ! कारण पुढचे तिन दिवस मद्याची मजा घेता येणार नाही, याची खात्री झाल्याने आता पुढील चार दिवस नक्कीच मद्य सुनामी येणार! मद्य विक्रीचे सर्व रेकॉर्ड ब्रेक होणार असे बोलले जात आहे.



राज्याची संपूर्ण आर्थिक नाडी, गणित, भिस्त या 'मद्य-महसुलावरच' अवलंबुन आहे. लोक बोलतात, मद्यप्राशन करणारे देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. सोमरस प्राशन करुनच देशाच्या अर्थ व्यवस्थेला एक प्रकारे बळकटी आणण्याचे पूण्यकर्मच हे लोक करतात. त्यांचे हाती देशाचा गाडा, अर्थव्यवस्था भविष्य आहे, अस बोलल जात आहे. अशातच आता सर्व दुकानात 'वाईन' विकण्यास देखिल मुभा देण्यात आल्याने, म्हणे सर्व राज्यातच मन में लड्डु फूट रहे है एक प्रकारे आनंदाची लहर (लाट) आली आहे.

तिन दिवसाच्या मद्यबंदीचा (ड्रायडे चा) सामना करण्यासाठी आता पासून स्टॉकचे नियोजन केले जात आहे. यात शंका घेण्याचे कारण नाही कारण निवडणुक होणार असे खात्रीलायक समजल्याने आता पुढील चार दिवस मद्याच्या महापूराची चिन्ह दिसू लागलीत. काल म्हणे एका प्रभागात पन्नास हजाराचे मद्य ढोसण्यात आले.

आणखी विशेष म्हणजे यावर पुरक व्यवसाय देखिल तेजीत आले असुन चायनीज, चिकण, मटण, मासे, पोपटीसाठी लागणारी अंडी, वाल शेंगा, कांदे, बटाटे, मसाल्याचे पदार्थ, फरसाण, कुरकुरे, बर्थडे केक, पुष्पगुच्छ अशा सर्व सागरसंगित व चाकणा सामूग्रींची मागणी वाढली, विक्री जोमात, भाव वधारले असुन या सर्व अत्यंत जीवनावश्यक वस्तुं मुळेच महागाईचा दर वाढला आहे.

तरी सुध्दा मोठ्या धैर्याने उमेदवार याचा सामना करीत आहेत. काहीही झाले कितीही किंमत्त चुकवावी लागली तरी चालेल पण आपल्या या चाहत्या, सोमरस रसिकांची (मतदारांची) सोय लावण्यासाठी आता एकही पाऊल मागे हटणार नाही, अशी भिष्मप्रतिज्ञा त्यांनी केल्याने सर्व चाहत्यांची चंगळ, सुगीचे दिवस आले आहेत. एकंदरीत आता प्रत्यक्ष निवडणुक प्रक्रिया पार पडण्यास काही क्षणांचा अल्पावधी उरला असुन निवडणुकीची लगीनघाई झाली आहे. चारदिवसात घोडेबाजार, प्रचार करणेसाठी तारेवरची कसरत करीत आता गल्लीबोळात रॅली आश्वासनांची खैरात केली जाणार. भुतकाळात, पाठीमागे काय विकास केला, कोणत्या समस्या आल्या, संकट आली? याची जराही तमा न बाळगता निवडणुकीची नशा, ताप चढला असून अनेक फंडे क्लृप्त्या वापरुन निवडणुक जोशात आली आहे.

या सर्व निवडणुक पंढरीत आता बडे नेते तळ ठोकुन बसणार असल्याने कोणतीही रसद कमी पडणार नाही. येणाऱ्या सूनामीशी दोन हात करण्यासाठी सर्व सज्ञ झाले आहेत. बाबा लगीन, बाबा लगीन प्रमाणे बाबा निवडणुक, बाबा निवडणुक! म्हणीत वातावरण तापले आहे. एकंदरीत निवडणुक जोशात आली असुन नाक्यानाक्यावर या उपहासात्मक खुमासदार खुसखुशीत चर्चांना उधाण आले आहे. यात गंमत जरी असली तरी वास्तव मात्र हेच आहे, अस लोक बोलतात. गंमतीचा भाग वगळता लोक म्हणतात कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा आणि निवडणुका.

## येरळ रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य, प्रवाश्यांच्या जिवाला धोका

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

सुतारवाडी ते येरळ हे अंतर सुमारे ४ कि.मी. चें अंतर या चार कि.मी. अंतरावर लहान - मोठे खड्डे मोठ्या प्रमाणावर पडलेले असल्यामुळे दुचाकी तसेच सायकल चालविणाऱ्या चालकांची खड्डे चुकविताना मोठी कसरत होत असते.तसेच रिक्षा, मिनिडोअर, यामधून प्रवास करतांना प्रवाश्यांना आपला जिव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

सुतारवाडी ते येरळ परिसरामध्ये विविध प्रकारचे फार्म हाऊस असल्यामुळे या परिसरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने सातत्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांमुळे सु-स्थितीत असलेल्या रस्त्याला खड्ड्यांचे स्वरूप प्राप्त झालेले आहे .एकीकडे शासनाकडून बोलले जाते कि गाव तेथे सुसज्ञ रस्ता परंतु गावाकडील रस्त्यांची अतिशय दयनीय अवस्था झाली आहे.

या रस्त्यावरून सर्व प्रकारचे वाहन चालवने अवघड व धोक्याचे झाले असून पायी चालणाऱ्यांना सुद्धा खड्डेमय रस्त्याचा वेळोवेळी त्रास होत आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याने दखल घेवून किमान या रस्त्यावर पडलेल्या खड्यांना पॅच मारून खड्डे बुजवावेत अशी अनेक प्रवश्यांकडून मागणी केली जात आहे.

## मोरा हायस्कूलमध्ये चिमुकल्यांची किलबिल, जल्लोषात स्वागत करून सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या पावणे दोन वर्षांपासून कोरोनाचे संकट आपल्या सर्वांवर जाणवत आहे. सध्या थोड्याफार प्रमाणात कोरोना नियंत्रणात आल्यामुळे राज्य शासनाने शाळांना विद्यार्थ्यांसाठी वर्ग सुरू करण्याचे निर्देश दिले .सदर निर्देश देताना शासनाने एक नियमावली सर्व शाळांना बनविली.

महाराष्ट्र शासनाच्या सर्व नियमावलीचे पालन करून आज जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था, संचलित इंग्लिश मीडियम स्कूल मोरा, उरण येथे विद्यार्थ्यांसाठी ऑफलाइन वर्ग सुरू करण्यात आला. खूप महिन्यांनी शाळा सुरू झाल्याचा उत्साह मुलांच्या चेहऱ्यावर दिसत होता. शाळा प्रशासनाकडूनही विद्यार्थ्यांना प्रवेश द्वारावरच सॅनिटायझर, त्यांची टेंपरेचर तपासून लहान मुलांना आवडता खाऊ म्हणजेच चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले . अशाप्रकारे झालेल्या स्वागता मुळे विद्यार्थीही खूप खूष दिसत होते.

शाळेतील सुरक्षिततेच्या नियोजनाबाबतीत बोलताना जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले की आमच्या संस्थेच्या माध्यमातून सुरू असलेल्या सर्व शाळांमध्ये आम्ही महाराष्ट्र राज्य शासनाने जी नियमावली सांगितले आहे. त्या नियमावलीचे काटेकोर पालन करून वर्ग सुरू केले आहेत. तसेच शाळेत येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणीची व्यवस्था सुद्धा आमच्या संस्थेच्या माध्यमातून आम्ही करत आहोत तसेच आरोग्याच्या बाबतीत विद्यार्थ्यांची घ्यावयाची काळजी संदर्भात आम्ही पालकांमध्येही जनजागृती करणार आहोत. जेणेकरून आमचा विद्यार्थी हा बौद्धिक दृष्ट्याच नाहीतर, शारीरिक दृष्ट्या सुद्धा सक्षम घडेल याचा आम्हाला विश्वास आहे.



## सुदाम पाटील यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विविध नागरी समस्यांबाबत साकडे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील विविध नागरि समस्येसंदर्भात महाराष्ट्र राष्ट्रवादी प्रदेश काँग्रेस सरचिटणीस सुदाम पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेवून विविध समस्यां संदर्भात त्यांच्या समोर निराकरण करण्यासाठी साकडे घातले आहे.



या अंतर्गत केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान पनवेल शहराच्या पाणी पुरवठा (न्हावा-शेवा) योजने संदर्भात, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करणेबाबत, पन-वेल महानगरपालिकेचा आकृतबंध मंजूर झाला असून भरती प्रक्रिया राबविणेबाबत, पनवेल महानगरपालिकेचा साडेदहा हजार कोटीचा विकास आराखड्या संदर्भात, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर स्थानिक संस्थांना भरपाई देण्याबाबत अधिनियम २०१७ अंतर्गत राज्यातील महापालिकांना अनुदान वितरित करण्यात येते त्याची थकबाकी येणेबाबत, सिडको विकसित नोड पनवेल महानगरपालिकेला हस्तांतरीत करणेबाबत, तळोजा औद्योगिक वसाहतीमधून होणारे जलप्रदुषण व वायु प्रदुषण संदर्भात कारखान्यांवर कडक कारवाई करणेबाबत, तसेच सिडकोच्या नवीन पनवेल, खांदा वसाहत, कामोठे, कळंबोली, रोडपाली नोड त्याचप्रमाणे राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ कळंबोली सर्कल ते टी पॉईंट हील पर्यंत व राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ कळंबोली तळोजा रोड तसेच कळंबोली सर्कल जवळील मॅकडोनल्ड समोर असंख्य खाजगी बसेस व अवजड वाहने बेकायदेशीररित्या पार्कींग केली जात असल्याने वाहतूक कोंडीसह अपघाताचे प्रमाण वाढले आहे. या संदर्भात वारंवार तक्रारी करून सुद्धा वाहतूक त्यावर कारवाई करत नाही आहे, त्याचप्रमाणे नागरी वस्तीमध्ये ज्वलनशील केमिकलचे टँकर उभे करण्यात येतात त्यामुळे परिसरातील रहिवाशांच्या जिवीताला धोका निर्माण झाला आहे. तसेच यातूनच भांडणे होतात व महिलांना येथून वावरणे असुरक्षित वाटते. तरी संबंधित वाहनांवर कायमस्वरुपी बंदी घालावी अशी मागणी सुद्धा सुदाम पाटील यांनी यावेळी केली आहे.

## माथेरानमध्ये शिवसेना शाखेचा भव्य उद्घाटन सोहळा

**दै.रायगड नगरी । माथेरान**




माथेरान मध्ये शिवसेनेची स्थापना ९ जून १९८७ साली करण्यात आली होती तेव्हापासून ते आजमितीपर्यंत इथे पक्षाची शाखा अस्तित्वात नव्हती.याकामी शिवसेनेचे कार्यसम्राट, गावातील एक दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून सुपरिचित असलेले शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांनी शहराच्या मध्यवर्ती भागात शिवसेना शाखेचे कार्यालय बनविले असून या शाखेचा उद्घाटन सोहळा कर्जत- खालापूर मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते दि.१६ रोजी सायंकाळी साडेचार वाजता असंख्य कार्यकर्त्यांच्या आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा प्रेरणा सावंत, माजी शहरप्रमुख दिवंगत कुमारभाई चौधरी यांच्या पत्नी आनंदीबाई चौधरी, शिवसेनेचे संपर्क प्रमुख प्रसाद सावंत, उप शहर प्रमुख प्रमोद नायक, सागर पाटील,वन समिती अध्यक्ष योगेश जाधव, वन समिती सदस्य ज्ञानेश्वर बागडे, चिटणीस वसंत कदम, माजी नगरसेवक प्रकाश सुतार, अवधूत येरफुले, कुलदीप जाधव, प्रसिद्धी प्रमुख अमोल चौगुले, जेष्ठ शिवसैनिक मनोहर रांजाणे, गणेश कदम, शिवसेनेचे आजी माजी पदाधिकारी आणि कार्यकर्ते तसेच युवा सेना, युवाअधिकारी निमेश मेहता ,महिला आघाडीच्या समस्त पदाधिकारी सदस्या, कार्यकर्त्या मोठया संख्येने उपस्थित होत्या.

शाखेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे औचित्य साधून शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी मित्र परिवारा तर्फे दिव्यांग बांधव, जेष्ठ गरजू नागरिक तसेच निराधार महिलांना दरमहा एकहजार रुपये मासिक पेन्शन योजना कार्यान्वित करण्यात आली आहे या उल्लेखनीय कार्याचा शुभारंभ सायंकाळी पाच वाजता श्रीराम चौकात आमदार महेंद्र थोरवे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.यावेळी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत, मुख्याधिकारी सुरेखा भणगे, सहायक पोलीस निरीक्षक संजय बांगर, राष्ट्रवादी काँग्रेस रायगड जिल्हा सरचिटणीस अजय सावंत, माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, विवेक चौधरी, हॉटेल असोसिएशनचे अध्यक्ष अनिल पतोडीया यांसह सर्वपक्षीय नेतेमंडळी व्यासपीठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमास विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदे, पतसंस्था सभापती हेमंत पवार, उप सभापती नारायण कदम, रिक्षा संघटना सचिव सुनील शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष राजेश दळवी, भाजप अध्यक्ष प्रवीण सकपाळ, शेकापचे चिटणीस शफिक शेख, मनसे अध्यक्ष संतोष कदम, आरपीआय अध्यक्ष अनिल गायकवाड, व्यापारी संघटना अध्यक्ष राजेश चौधरी, कोकण वासीय समाज अध्यक्ष शैलेंद्र दळवी, मुस्लिम समाज अध्यक्ष नासीर शारवाण, चर्मकार समाज अध्यक्ष गजानन अबनावे, मराठा समाज अध्यक्ष विकास पार्टे, वाल्मिकी समाज अध्यक्ष अंबालाल वाघेला, धोबी समाज अध्यक्ष आकाश चौधरी, धनगर समाज अध्यक्ष राकेश कोकळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या सर्व कार्यक्रमाचे निमंत्रक आयोजक रेखा चौधरी, चंद्रकांत चौधरी होते.

## खाद्यतेलाच्या दराचा आलेख उतरणीला

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी - श्रीवर्धनमध्ये पर्यटन व्यवसाय सोबतच कौटुंबिक बजेट खाद्यतेलाच्या दरावर अवलंबून आहे. सप्टेंबर मध्ये महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले होते. मात्र, मागील दोन महिन्यांनंतर अनेकांना दिलासा मिळाला आहे. कारण आता खाद्यतेल स्वस्त झाले आहे.

गणेशोत्सवात तेलाची मागणी वाढली होती. शहरातून येणाऱ्या तेलाच्या दरात घाऊकमध्ये प्रतिकिलो व लिटर नुसार १५ लिटर डबा २७०० रुपयांनी दुकानदारांना मिळत असे. त्या तेलाच्या डब्याचे सद्या भाव २२०० पर्यत आल्याने किरकोळ विक्रीत २५ ते ३० रुपयांची घट झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी एक खुशखबर असून त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सोयाबीन, सूर्यफूल, पामतेल, शेंगदाणा, सनफ्लॉवर व मोहरी अशा सर्व खाद्यतेलांची वाढ झाली होती. आता ती कमी झाली असल्याने किरकोळ दरातदेखील मोठी घसरण झाली आहे. देश कोरोनाच्या महाभयंकर संकटाचा सामना करत आहे. त्यातूनच अनेकांना व्यवसाय व उदरनिर्वाहसाठी लागणारे खाद्यतेल महागल्याने घरगाडा चालवण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती. गेली दोन महिन्यापासून दरवाढीचा चढता आलेख असलेल्या खाद्यतेलाचे भाव काहीसे घसरले आहेत. सर्वच प्रकारच्या खाद्यतेलाचे भाव लिटरमागे पाच ते दहा रुपयांनी कमी झाले आहेत. तेलाच्या किमती कमी झाल्याने कुटुंबातील गृहिणी तसेच पर्यटनावर अवलंबून व्यवसायिकांना आता स्थिरता मिळाली असून पुढे कच्चा मालाचा होणारा पुरवठ्यामागे तेलाचे भाव लिटर मागे अजून ५ ते १० रुपयांनी कमी होतील, अशी शक्यताही विक्रेत्यांनी व्यक्त केली.

## सर्व गरजूंनी योजनेचा जास्तीस्त जास्त लाभ घ्यावा : शिरीष घरत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतुन खारघरमध्ये रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कोरोना महामारी परिस्थितीत सर्व सामान्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देत, आर्थिक दृष्टीने बळकट करण्यासाठी महाराष्ट्र शासन रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी सर्वांना उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. सदर योजना ही १५ डिसेंबर ते ३० डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे, यासाठी पन-वेल मधील सर्व गरजूंनी या योजनेचा जास्तीस्त जास्त लाभ घ्यावा असे आवाहन शिरीष घरत यांनी मेळाव्याप्रसंगी केले. यावेळी शिवसेना जिल्हा सल्लागार बबन पाटील, जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, उपजिल्हा संघटक परेश पाटील, तालुका संघटक भरत पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, महानगर प्रमुख रामदास शेवाळे, तालुका संपर्कप्रमुख योगेश तांडेल, यतीन देशमुख, उपजिल्हासंघटिका कल्पना पाटील, विधानसभा संघटिका रेवती सकपाळ यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी, शिवसैनिक आदी पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## घरोघरी जाऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे मतदारांना साकडे

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा शहरात नगरपंचायत निवडणुकीचा प्रचार ऐन रंगात आला आहे. शहरातील समस्या दूर करायच्या असतील तर आम्हांलाच संधी द्या असा प्रचार राष्ट्रवादी काँग्रेस कडून केला जात आहे. या भागाचा विकास घडवून आणण्यासाठी एकवार संधी द्या असे साकडे मतदारांना घातले जात आहे. यासाठी घरोघरी जाऊन प्रचार करण्यावर अधिक भर दिला जात आहे. खासदार सुनील तटकरे, पालकमंत्री ना.अदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे राष्ट्रवादी उमेदवारांच्या प्रचारासाठी उतरले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार उभे असलेल्या प्रभागात खा.सुनील तटकरे यांनी मतदारांच्या घरोघरी जाऊन प्रचार केला. निवडणुकीच्या प्रचारात मतदारांच्या घरोघरी जाऊन त्यांच्या भेटी घेण्यावर राष्ट्रवादीचा विशेष भर दिसत आहे. उमेदवार भेटीला आले नाहीत, म्हणून मतदार नाराज होऊ नयेत यासाठी राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी विशेष काळजी घेण्यास सुरुवात केली आहे. दिवसभरात विविध संस्था, संघटना, ग्रामस्थ महिला मंडळांना भेटी देऊन निवडणुकीचा प्रचार करण्यावर भर देण्यात येत आहे. प्रचाराला कमी दिवस राहिल्याने घरोघरी जाऊन उमेदवाराचे माहितीपत्रक, केलेल्या कामाचा अहवाल, विजयी झाल्यानंतर मतदारसंघात केल्या जाणाऱ्या विकासकामांची माहिती घरोघरी जाऊन राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांची टीम करत आहेत.राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारास मतदारांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याने यावेळी नगरपंच्यतीमध्ये सत्ता बदल अटळ असून राष्ट्रवादी काँग्रेसचा नगराध्यक्ष विराजमान होणार असल्याचा विश्वास शहर अध्यक्ष महेंद्र काजबजे यांनी व्यक्त केला आहे.